International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 jan-Feb 2023

# प्रादेशिक असमतोल आणि वैधानिक विकास मंडळाची भूमिका.

**डॉ.नरसिंग भानुदास देशमुख**
सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग, महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.
**DOI- 10.5281/zenodo.16759235**

**प्रास्ताविक:**

महाराष्ट्र राज्यातील विकासात प्रादेशिक असमतोल किती आहे? तो नेमका कसा मोजावा? व तो दूर करण्यासाठी कोणते उपाय योजावेत ? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात हे जाणून घेण्यासाठी शासनाने विख्यात अर्थतज्ञ प्राध्यापक वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑगस्ट 1983 साली एक समिती नेमली आणि या समितीने एप्रिल 1984 ला आपला अहवाल शासनाकडे सादर केला. महाराष्ट्रातील विदर्भ, कोकण आणि मराठवाडा या विभागातील विविध जिल्ह्यात 1982-83 च्या किंमतीनुसार प्रादेशिक समतोल राखण्यासाठी एकूण 3,187 कोटी रुपये एवढा विकास खर्च अपेक्षित आहे अशी तरतूद समितीने नमूद केली. अनुक्रमे कोकण- 296 कोटी रुपये, पश्चिम महाराष्ट्र- 884 कोटी रुपये,मराठवाडा- 751 कोटी रुपये, विदर्भ -1,286 कोटी रुपये व बृहन्मुंबई 10 कोटी रुपये असा अनुशेष आहे. त्यासाठी समितीने एकुण वार्षिक योजनेच्या 40% निधी राखून ठेवावा असे स्पष्ट मत मांडले. नंतर 1993-94 या कालावधीत 4,97.8 कोटीची तरतूद आहे. दांडेकर समितीच्या अहवालानुसार काही लोकांनी अनुकूल व प्रतिकूल मते मांडली गेली. असे बोलने झाल्यानंतर बऱ्याच व्यक्तींनी तो अहवाल जाळण्यापर्यंत मजल मारली. त्यामागे कारण असे की त्या अहवालामध्ये निश्चित इतर अशी अनेक कारणे दिसतात. मागासलेल्या भागाचा निकष काढण्यासाठी व त्या विभागाचा अनुशेष मोजण्यासाठी राज्यपाल यांनी दिनांक 03/01/1996 रोजी 11 सदस्याचे एक समिती नेमली आणि त्यामध्ये उदाहरणार्थ दिवाकर रावते, सुभाष देसाई इत्यादींनी जे या निकषाचे विचार मांडले, हे दांडेकर समितीने मांडलेल्या विचारा पेक्षा नवीन आणि वेगळे असून तेच पुढे आलेले दिसतात. प्रादेशिक विकास मंडळे; दांडेकर समितीच्या अहवालानुसार टिका प्रती-टिका होत असतानाच जुलै-1984 मध्ये दोन्ही विधिमंडळांनी एक निर्णय ठराव समत केला व त्यान्वये विनंती करण्यात आली की, राष्ट्रपतींनी भारतीय राज्यघटनेतील कलम 371 (2) नुसार विशेष अधिकार वापरून विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास मंडळे स्थापन करावेत आणि हे मंडळ देखील राज्यपाल यांना जबाबदार राहील ही जबाबदारी विधिमंडळावर न टाकता राज्यपालावर टाकली जाते परंतु कित्येक वेळा राज्यपाल नेमणूक ही राजकीय हेतूनेच केली जाते. मग अशा परिस्थितीत या विशेष मंडळांनी काही साध्य होणार नाही असे वाटते. पश्चिम महाराष्ट्राचे वर्चस्व असणाऱ्या राज्य शासनास गेली 25 वर्ष जमले नाही तीही मंडळी साध्य करणार काय? असेल उपप्रश्न निर्माण होतात म्हणून विकास कामात गतिशीलता व लवचिकता आणण्यासाठी अंतिम निर्णय केंद्र सरकारने घेणे आवश्यक आहे याविषयी अर्थतज्ञ श्री पालखी वाला म्हणतात की, "हे सर्वात संदिग्ध व असमाधानक कलम आहे जर या कलमानुसार सर्वोच्च न्यायालयाने ठरविले तर पर्यायाने राष्ट्रपतीचा निर्णय सुद्धा चुकीचा ठरू शकतो" असे असून देखील त्यातील सत्यता असे आढळते की निश्चित त्या मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी आर्थिक तरतूद काय? याला उत्तर नाही.

**वैधानिक विकास महामंडळाचा उदय:**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार 01 मे 1994 रोजी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात आली आणि या मंडळावर प्रत्येकी सात सदस्य दिसून येतात त्याची नेमणूक राज्यातील राज्यपालामार्फत केलेली असते. त्या भागातील विधानसभा सदस्य एक , स्थानिक प्राधिकरण सदस्य शिवाय नियोजन, प्रशासन, उद्योग, पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम अशा क्षेत्रातील तज्ञांची मंडळावर सदस्य म्हणून नेमणूक केलेली असते. मागासभागातील विकास या घटकांचा विचार करताना नेमकी कोणती आधारभूत तत्वे स्वीकारली जाणार हे कळणे कठीण आहे. या परिस्थितीला दांडेकर समितीची वैचारिक बैठक जशी योग्य वाटत असली तरी ती अपुरी आहे असेच म्हणावे लागेल. कारण अनुशेष मोजताना या समितीने जिल्हा, तालुका या घटकास महत्त्व दिलेले दिसते. परंतु नंतर हा घटक घेण्याऐवजी विभाग किंवा क्षेत्राचा विचार पुढे आलेला दिसतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक हे प्रादेशिक विकासाबाबत म्हणतात. "प्रादेशिक विकास कार्यासाठी विभाग किंवा क्षेत्र निवडण्याऐवजी जिल्हा घटक मानावा". हे वसंतराव नाईक यांनी आपले मत ऑगस्ट 1969 रोजी या करारात व्यक्त केले होते. परंतु त्यावर कोणीही प्रतिक्रिया दिलेल्या नव्हत्या म्हणून नागपूर करार सुद्धा गुंडाळून ठेवावा लागला. मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाने तालुका, जिल्हा, क्षेत्र किंवा विभाग यापैकी कोणत्या घटकाची निवड विकासासाठी करणे योग्य आहे ? हे लक्षात येण्यासाठी

विशेष अभ्यास म्हणून पुढील तुळजापूर तालुक्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आणि तो कितपत योग्य आहे ? हे पुढील संशोधित अभ्यासाने लक्षात आलेले आहे.

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाने दिलेले योगदान** ;

महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद हा एक जिल्हा असून उस्मानाबाद जिल्ह्यात आठ तालुके आहेत. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी या देवस्थानामुळे या जिल्ह्यास पर्यटक ,आर्थिक, बाजारपेठ असे आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झालेले दिसते. 1910 मध्ये निजाममीर उस्मान अलीखान या राजाने आपल्या राज्यरोहन प्रसंगी या शहराला स्वतःचे नाव दिले तेव्हापासून धाराशिव या नावाऐवजी उस्मानाबाद या नावाने ओळखले जाते वैधानिक विकास मंडळाने तुळजापूर तालुक्याच्या आर्थिक विकासाला चालना दिलेली दिसते.व्यक्तीच्या जीवनातील फार मोठा कालखंड असतो असे नाही परंतु इतिहासाचे गती काळाच्या गतीने नियंत्रित होत नसते अशा वर्षानुवर्ष संतगतीने चालणाऱ्या इतिहासाचा प्रभाव हा क्षणार्धात अशा वैज्ञानिक विकासाच्या कार्याने उफाळून वाहू लागलेला दिसतो. त्यामुळेच की काय समाज जीवनात अमुलाग्र बदल झालेला आहे असे वाटते.

वास्तविक पाहता आर्थिक विकासाला चालना देणारी जी साधने असतात उदाहरणार्थ भांडवलाचा पर्याप्त वापर, आधुनिक तंत्राचा वापर, व विविध तांत्रिक ज्ञान ह आर्थिक विकासाला चालना देणारे घटक असतात.आर्थिक विकास म्हणजे सरकारने सहेतुक केलेल्या प्रयत्नाचे फळ म्हणजेच आर्थिक विकास होय. यामुळेच तुळजापूर तालुक्यात अस्तित्वात आलेल्या दिसतो.या तालुक्या अंतर्गत मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाने केलेल्या निधीची केलेली उपलब्धता ही विकास कार्यासाठी खर्च केलेली दिसते.

- ❖ रस्ते विकास, शेतरस्ते मजबुतीकरण,अंतर्गत रस्ते डांबरीकरण व नवीन रस्ते असे एकूण त्या तालुक्यातील 110 गावापैकी 34 गावांमध्ये ही कामे पूर्ण करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जवळपास 4 कोटी 20 लाख 36 हजार रुपये खर्च केलेला आहे.
- ❖ **पुल बांधकाम:** या पूल बांधकामासाठी देखील मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने जवळपास तीन कामे पूर्ण करण्यात साठी 15 लाख रुपये खर्च केलेला दिसतो.
- ❖ उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील 110 गावा पैकी 26 गावाला वैधानिक विकास मंडळाने जवळपास सामाजिक सभागृह बांधकाम निधी म्हणून 01 कोटी 24 लाख 8 हजार रुपयांची रक्कम खर्च केलेली आहे.
- ❖ कृषी पॉलीक्लिन स्थापन करण्यासाठी तसेच कृषी व तंत्रज्ञान माहिती प्रदर्शन केंद्र व नर्सरी इत्यादी स्थापन करण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने 27 लाख रुपयांची दोन कामे पूर्ण करण्यासाठी खर्च केले आहेत.
- ❖ नगरपरिषद विकास कामासाठी वैधानिक विकास मंडळाने तीन कामे पूर्ण करण्यासाठी जवळपास एकूण निधी पैकी 27 लाख 22 हजार रुपये खर्च केलेले आढळून येतात.
- ❖ महिला मंडळ बैठक सभागृह बांधकामासाठी पाच लाख रुपये निधी खर्च करण्यात आला. विविध शेती,जोड व्यवसायासाठी हे दोन कामे पूर्ण करण्यासाठी खर्च केला. मेंढी विकास क्षेत्र विस्तारीकरण यासाठी वैधानिक विकास मंडळ अंतर्गत 41 लाख 40 हजार विकास निधी म्हणून दिल्याचे आढळून येते.

वरील सर्व कामे वैधानिक विकास मंडळ निधी अंतर्गत केलेले दिसतात. त्याचा एक दर्शीत हा एकूण तालुक्यातील सर्व कार्यावरून होणारा विकास खर्च 817 कोटी 39 लाख 15 हजार रुपये खर्च केलेला दिसतो.

वरील वैधानिक विकास मंडळांनी आर्थिक कार्यासाठी खर्च केलेली रक्कम ही खरंच विभागीय आर्थिक समतोल राखण्यासाठी योग्य आहे काय? कि जिल्हा समतोल राखण्यासाठी? हे तालुका समतोल राखण्यासाठी? असे अनेक प्रश्न निर्माण होतात नंतर आपणाला असे म्हणावे लागेल की ही विकास महामंडळे स्थापन करताना यावर मालकी सरकारची असताना देखील स्वतंत्र कायद्याने निर्मित झालेली दिसते. परंतु सरकारी तिजोरीतून कमी खर्चावर बंधन नाहीत, यावर लोकसभेत चौकशी नाही, आणि प्रबंधक वेतन नेमणूक इत्यादीसाठी स्वतःच नेमणूक करून वापरण्याचे कार्य यामध्ये असते म्हणूनच याची यशस्वीता टिकवणे हे काम कठीण दिसते. मग आपणास पहिला मानलेला वसंतराव नाईक यांनी जिल्हा घटक समतोल ठेवण्यासाठी मानावा याकडे वळावे लागते. तसेच मराठवाडा विभाग किंवा इतर विभागातील समतोल विकास साध्य होऊ शकेल का, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची भूमिका एकांगी स्वरूपाची दिसते.कारण बऱ्याच तालुका आणि जिल्ह्यामध्ये वैधानिक विकास मंडळ म्हणजे काय? ते कशासाठी असते माहीतच नाही तर तुळजापूर तालुक्याच्या ठिकाणी झालेला विकास मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने केलेले कार्य हे मौल्यवान आहे यामुळे आर्थिक वृद्धीत वाढ होऊ शकते परंतु आर्थिक समतोल घडून येईल हे सांगता येत नाही. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे प्रादेशिक विकासातील असणारे भूमिका ही महत्त्वाची आहे यासाठी विशेष निधीची तरतूद व त्याचे समान वाटप झाले तर त्याचा नक्कीच समतोल आर्थिक विकास घडवून आल्याशिवाय राहणार नाही. हे सत्य मानावे लागेल.त्यामध्ये राजकीय ढवळाढवळ, कायदा अंतर्गत बंदिस्त, संचालक हितसंबंध, कुशल कर्मचारी अभाव इत्यादी दोष मान्य केल्यास सर्व वैधानिक विकास मंडळे यशस्वी होऊ शकतील असे विश्वासाने सांगता येईल.

**संदर्भ:**


1. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल-प्रा.वि.म. दांडेकर.
2. मराठवाड्याचा विकासाचा अभ्यास व चिंतन-श्री.भुजंगराव कुलकर्णी
3. निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल.
4. मराठवाड्यातील पाणी प्रश्नाने विकास समस्या श्री य.र. जाधव
5. भारतीय अर्थशास्त्र -दत्त सुंदरम